ARTHA, Poona 4
Tel. [illegible]27

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष [illegible] पुणे, बुधवार ३ एप्रिल १९६८ अंक ७




### बँकांतील सेव्हिंग्ज खात्यावरील नवी बंधने

'इंटर-बँक डिपॉझिट रेटस' या करारात सहभागी असणाऱ्या, प्रायव्हेट सेक्टरमधील हिंदी व्यापारी बँकांनी आपल्या सेव्हिंग्ज बँक ठेवींच्या खात्यांचे बाबतीत दोन नव्या अटी घातल्या आहेत : ( १ ) महिन्यातून पाच वेळाच पैसे काढता येतील आणि ( २ ) जास्त काढल्या गेलेल्या पैशांचे बाबतीत दंड योजना अंमलात येईल. १ एप्रिल, १९६८ पासून ह्या अटी अमलात आल्या आहेत; व्याजाचा दरही ४% चा ३½ करण्यात आला आहे.

नवीन अटींचे स्वरूप असे आहे :– कोणत्याही ठेवीदाराला महिन्यातून पाच पेक्षा जास्त वेळा चेकने वा अन्यथा पैसे काढता येणार नाहीत. जास्त वेळा पैसे काढले गेले, तर त्या खात्यावर त्या महिन्याला व्याज मिळणार नाही. ( सध्या प्रत्येक आठवड्याला दोनदा पैसे काढता येतात; काही बँकांतून वर्षात २०० वेळा काढता येतात. )

कोणत्याही आठवड्यात, शिलकेच्या १० % किंवा १,००० रु. ( जी रकम जास्त असेल ती ) पेक्षा जास्त रकम, १० दिवसांची अगाऊ सूचना दिलेली असल्याखेरीज, काढता येणार नाही. ह्या मर्यादेपेक्षा जास्त रकम काढली गेली, तर त्या खात्यावर त्या महिन्याचे व्याज मिळणार नाही.

सेव्हिंग्ज खात्यात एक लक्ष रुपये ठेवता येतील व त्यावर व्याज मिळेल; सध्याची मर्यादा ५० हजार रुपयांची आहे.

---

### गूळ करणाऱ्या सहकारी सभासदांविरुद्ध कारवाई

१९६६–६७ साली सहकारी साखर कारखान्यांच्या २,३४५ सदस्यांनी ऊस न घालता गूळ तयार केला. यासंबंधात ३९९ सभासदांकडून ३,२६,१४४ रु. नुकसानभरपाई वसूल करण्यात आली. पाच सभासदांचे सभासदत्व रद्द करण्यात आले. ६,८६० रुपये किंमतीचे भाग जप्त करण्यात आले.

१९६७–६८ मध्ये अशा प्रकारची ४,८६४ प्रकरणे निदर्शनास आली. त्यापैकी १,६१३ प्रकरणी पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली. ४५८ प्रकरणी लवाद दावे करण्यात आले. १,०८९ प्रकरणी १२,३०,०४८ रुपये नुकसानभरपाई म्हणून वसूल करण्यात आले. ६६ प्रकरणी सदस्यत्व रद्द करण्यात आले. १३,१२५ रु. चे भाग जप्त करण्यात आले व १,९५० रु. कायम बचत जप्त करण्यात आली.

---

### प्रवाशांच्या धंद्याला परदेशी तज्ज्ञांचा सल्ला

परदेशी प्रवासी आकर्षण्याच्या धंद्याचा भारतामधील वाव अंदाजण्यासाठी युनायटेड नेशन्सच्या एका मंडळाला भारत सरकारने पाचारण केले आहे. एक अर्थशास्त्रज्ञ, एक प्रवासी एजंट व एक होटेल तज्ज्ञ, ह्यांचा त्या मंडळात समावेश असेल.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे. संपादक 'अर्थ'

किंमत ५० पैसे.





# ☆ अर्थ ☆

बुधवार, ३ एप्रिल, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## समृद्धीसाठी आणि भरभराटीसाठी उपाय

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनी मुंबई येथील रोटरी क्लबमध्ये एक भाषण केले. हिंदमधील दारिद्र्याचे उच्चाटन करण्यासाठी आतापर्यंत तीन पंचवार्षिक योजना अमलात आणल्या गेल्या. परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाही. सध्याच्या कठीण परिस्थितीला देशाचे गेल्या २० वर्षातील राजकीय नेतृत्व जबाबदार आहे हा विचार आता बळावू लागला आहे. श्री. अय्यंगार यांनी आपल्या भाषणात अशाच प्रकारचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की, देशात भरभराटीचे व समृद्धीचे युग निर्माण करावयाचे असेल तर निराळ्या व नव्या राजकीय पद्धतीने कारभार चालविण्यात आला पाहिजे. राज्यकारभार योग्य रीतीने आणि जोमाने चालविण्यात आला तर भूक आणि दारिद्र्य ह्याचे उच्चाटन करता येणे शक्य आहे. पण राजकारणी लोक सत्तेसाठी डावपेच लढविण्यात, राजकीय कारस्थाने करण्यात आणि आसनस्थ सरकारे उलथून पाडण्यातच गर्क असतात. देशातील तरुण पिढी काबाडकष्ट करण्यास समर्थ आहे. केवळ संधीचीच वाट ती पाहात आहे परंतु, त्यांच्या कार्यशक्तीला योग्य वळण लावणारे पुढारीपण मात्र दिसत नाही. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी काही गोष्टी मूलभूत स्वरूपाच्या आहेत. केवळ तांत्रिकदृष्ट्या विचार केला तर १५ कोटी टन अन्नधान्याचे उत्पादन करता येणे अशक्य नाही. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी पाणी, बी-बियाणे, खते आणि पतीवर कर्ज ह्या चार गोष्टींची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे उत्पादन आणि त्याचे वाटप ह्याची सुसूत्र व्यवस्थाही करण्यात आली पाहिजे. ह्या कामी सहकारी चळवळीची कार्यक्षमता वाढविण्याची फार जरूर आहे.

## सरकारी मालकीच्या कारखान्यांच्या व्यथा

सरकारी मालकीच्या भारतामधील औद्योगिक संघटना रशियाच्या मदतीने उभारण्यात आलेल्या आहेत. सार्वजनिक मालकीच्या ह्या संघटनांचा कारभार कार्यक्षमतेने चालविला जात नाही अशी तक्रार करण्यात येते. सरकारी मालकीच्या कारखान्यांच्या कारभाराची पाहाणी करण्यासाठी रशियन तज्ज्ञांचे एक मंडळ भारतात आले होते. मंडळाने आपल्या दौऱ्यात सरकारी मालकीच्या काही मोठ्या कारखान्यांना भेटी दिल्या. भारतामधील सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांतील अकार्यक्षमतेची दोन मुख्य कारणे मंडळाने नमूद केली आहेत. एक कारण असे की कारभार चालविणारे अधिकारी अननुभवी असतात; आणि दुसरे म्हणजे कामगारवर्गात शिस्तीचा अभाव असतो. वरिष्ठ सरकारी नोकरांना ह्या कारखान्यातून हंगामी नेमणुका देण्याच्या प्रथाताबद्दल मंडळाने नापसंती दर्शविली आहे. अशा नेमणुका करण्यापेक्षा कारखान्यात काम करणाऱ्यांतून लायक लोक नेमावेत असे सुचविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे एका उद्योगधंद्यात एकच कामगारसंघटना असावी. नाहीतर कामगार संघटनांच्या झगड्यात कारखान्याची उत्पादनक्षमता खालावते. काही कारखान्यांतून जरुरीपेक्षा अधिक माणसे ठेवण्यात आली आहेत. पुष्कळदा तात्पुरते म्हणून घेतलेल्या कामगारांना कायम करण्यात आले आहे. पण, हे लोक ते करीत असलेल्या कामात लायक असतातच असे नाही. तेव्हा अशा कामगारांना प्रशिक्षण देण्यात यावे अगर त्यांना दुसरे काम देण्यात यावे असे सुचविण्यात आले आहे.

## आर्थिक भवितव्य उत्साहजनक असल्याचा अभिप्राय

फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रिज ह्या संघटनेचे परदेशाबाबतचे सल्लागार सर नॉर्मन किपिंग ह्यांनी भारताचे आर्थिक व औद्योगिक भवितव्य उत्साहजनक असल्याचा अभिप्राय व्यक्त केला आहे. भारतामधील शेतीच्या धंद्यात क्रांतिकारी बदल होत असल्याने परिस्थिती चांगलीच आशादायक आहे, असे त्यांचे मत झाले आहे. ते म्हणतात की शेतीमध्ये घडून आलेला बदल हा केवळ चांगले पाऊसपाणी झाल्याने झाला असे म्हणता येणार नाही. चांगले बीबियाणे, खतांचा पुरवठा आणि पाण्याची उपलब्धता ह्यांचाही खूप उपयोग झालेला आहे. शेतीच्या व्यवसायाला भरभराट आल्यामुळे शेतकऱ्याच्या हातात १,२०० कोटी रुपये खेळू लागतील. त्यामुळे टिकाऊ स्वरूपाच्या उपभोग्य मालाची त्यांची मागणी वाढत जाईल. त्याचप्रमाणे नवीन उद्योगधंदे काढण्यासाठी ग्रामीण भागातून होणाऱ्या भांडवलाच्या पुरवठ्यातही बरीच सुधारणा होईल. परंतु ग्रामीण आणि अर्धग्रामीण भागात बँकांच्या सोई-सवलती ज्या मानाने उपलब्ध होऊ शकतील त्यावर भांडवल पुरवठ्याचा वेग अवलंबून राहील. आतापर्यंत ग्रामीण भागातील मोठी बाजारपेठ उपेक्षित राहिलेली आहे. परंतु आता पुढाकार घेणाऱ्या भांडवलदारांनी थोडेसे साहस केले तर ही बाजारपेठ त्यांना फलदायी ठरण्यासारखी आहे.

## गुजरातमधील पहिला चित्रपट स्टुडिओ

बडोदा शहरापासून महा मैलांवर असलेल्या सयाजीपुरा ह्या ठिकाणी गुजरात राज्यातील पहिला चित्रपट निर्मितीचा स्टुडिओ बांधण्यात येत आहे. त्याच्या उभारणीसाठी ५० लाख रुपये खर्च येणार आहे. पूर्व आफ्रिकेतून परत आलेल्या काही गुजराती धनिकांनी तो उभारण्यात पुढाकार घेतला आहे. ह्या स्टुडिओत पश्चिम जर्मनीत बनविण्यात आलेली यंत्रसामग्री बसविण्यात येत आहे. गुजरात सरकारने सवलतीच्या अटीवर जमीन देऊ केली तर त्या राज्यात इतरही काही ठिकाणी चित्रपट निर्मितीची सोय करण्यास धनिक उत्सुक आहेत. मुंबईमधील एक चित्रपट-निर्माता राजकोट येथे स्टुडिओ बांधत आहे. आनंद येथेही आणखी एक स्टुडिओ बांधला जाण्याची शक्यता आहे.

---

## रेल्वेला फुकटे प्रवासी व चोऱ्या ह्यांचा भुर्दंड


दंगली आणि हिंसक चळवळी ह्यांनी रेल्वेचे अलीकडे फार नुकसान होत असते. ह्या नुकसानीकडे साहजिकच अधिक लक्ष दिले जाते. परंतु विनातिकीट प्रवास करणारे लोक आणि रेल्वेच्या सामानाच्या चोऱ्या ह्या कारणांमुळे रेल्वे खात्याला केवढी झळ पोचते ह्याची कल्पना सहज येत नाही. ह्या दोन्ही कारणांमुळे रेल्वे खात्याला दरसाल १० कोटी रुपयांची नुकसानी सोसावी लागते. डब्यातील पंखे, विजेचे दिवे व इतर सामान ह्यांच्या चोऱ्यांमुळेच सुमारे १६ लाख रुपयांचे नुकसान होते. ही नुकसानी रेल्वेमधील नोकरांच्या साथीमुळे होते अशी कबुली रेल्वे-खात्याने दिली आहे. ह्यावर उपाय म्हणून अचानक धाड घालणारी पोलिसांची पथके आणि रेल्वे मॅजिस्ट्रेटस् ह्यांची योजना करण्यात येत आहे.


---

## यांत्रिक शेतवाडीसाठी रशिआची मदत

सोव्हिएट रशिआने पाच मोठ्या यांत्रिक शेतवाड्या स्थापन करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री भारताला देऊ केली आहे. प्रत्येक वाडीसाठी जास्तीत जास्त ३१ लाख रुपयांची सामग्री पुरविण्यात येणार आहे. त्याशिवाय आणखी १० शेतवाड्यांसाठी लागणारी यंत्रसामग्री उधारीने देण्याची तयारी रशिआने दाखविली आहे. सलग जमीन ज्या मानाने उपलब्ध होईल त्या मानाने अशा शेतवाड्यांत ८ ते १० हजार एकर जमिनीचा समावेश करण्यात येईल. संकल्पित शेतवाड्यात चांगल्या प्रतीचे बी-बियाणे निर्माण करण्याचे काम मुख्यत: होईल. ओरिसा राज्यातील हिराकुड भागात अशा धर्तीची एक शेतवाडी सुरूही करण्यात आली आहे.

---



# जेट युगातील मराठी माणूस

व्हीनस प्रकाशन व्याख्यानमालेतील श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांची उद्बोधक व्याख्याने.

### स्वकष्टानेच जगेन, व्याख्याने देऊन नाही

ह्या व्याख्यानाबाबत एक खुलासा करून टाकतो. कारण तो न केला तर माझं कौटुंबिक जीवन धोक्यात येण्याचा संभव आहे. त्याचं असं झालं, की मी तीन व्याख्यानं द्यायचं कबूल केल्याबरोबर सौ. यमूताईंनी अगदी सौम्य शब्दात—पण आवाज खणखणीत होता बरं,—मला विचारलं, "अहो, कारखान्याचं काम सोडायचा विचार आहे की काय तुमचा?" माझा तसा बेत नाही, असं मी त्यांना सांगितलं. मित्रहो, मी तुम्हां सर्वांना साक्षीला ठेवून, समोर बसलेल्या यमूताईंना पुनः आश्वसन देतो की आजपर्यंत स्वकष्टानं पैसे कमवून जसं मी आयुष्य जगलो, तसच ह्यापुढेही जगेन. व्याख्यानं देऊन नाही.

मी सुरुवातीलाच स्पष्ट सांगतो की एखाद्या तज्ज्ञाची किंवा संशोधकाची भूमिका घेऊन मी बोलणार नाही. माझा व्यवसाय करीत असताना मला जे निरनिराळे अनुभव आले आणि त्याबाबत मी जो विचार आणि अभ्यास केला, त्याच्या आधारावर मी बोलणार आहे. जेट युगातला मराठी माणूस मला रोज भेटतो, म्हणूनच मी त्याच्यावर बोलतो आहे.

### जेट युग हे विज्ञानाचं आणि वेगाचं

आपलं जग बदलतं आहे. बदलणारं सगळंच काही आपल्याला आवडत नाही. आयुष्याचं जे रूप आपल्या अंगवळणी पडलं असेल त्याची आपल्याला सवय होते. जे विचार, जे पोषाख, ज्या शिक्षणपद्धती आपल्या अंगवळणी पडतात, त्यात बदल झाले तर ते आपल्याला आवडत नाही. म्हणून वयानं मोठी असणारी माणसं लहानांच्याबद्दल आज तक्रार करतात.

जेट युग हे विज्ञानाचे आणि वेगाचे युग आहे. आपल्या सर्वांच्या आयुष्यावर ह्या युगानं परिणाम केला आहे. आज वेगाचं गणित ओळखून आपण आपली कामं आखतो. वाहनांचा वेग वाढला, तसा आपल्या कामाचा पण वाढला.

विज्ञानानं निर्माण केलेल्या वेगानं आमची आयुष्यं बदलायला लागली आहेत. माझा स्वतःचा अनुभव सांगतो. वयानं साठीच्या घरात शिरून मला चार-पाच वर्षे झाली. अजूनही ठराविक झोपणं, उठणं, जेवणं, फिरायला जाणं मला जमत नाही. असा साचेबंदपणा मला माझ्या आयुष्यात आणता येणार नाही. आपल्यापैकी पुष्कळांना असा अनुभव आला असेल. माझ्या पिढीच्या आयुष्याची संध्याकाळ ज्या जेट-युगात होत आहे त्यातच नव्या पिढीच्या आयुष्याची प्रभात होते.

### बदल सगळीकडे सारख्या प्रमाणात नाही

माणसाच्या जीवनाचा हा क्रम आहे. हे सगळीकडे होतं. पण, जर बारकाईनं पाहिलं तर मनात एक प्रश्न उभा राहतो, हे सगळीकडे सारख्याच प्रमाणात होतंय का?

असं दिसत नाही. एखाद्या देशातल्या समाजात जेवढे बदल झालेले दिसतात तेवढे दुसऱ्या देशातल्या समाजात झालेले दिसत नाहीत. फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका किंवा जपान ह्या देशांतल्या समाजाचं जीवन ज्या प्रमाणात बदललं, त्या प्रमाणात आमचं जीवन बदललं नाही. त्या देशांतल्या नागरिकांच्या जीवनात आलेला वेग, आलेली संपन्नता, आमच्या जीवनात आलेली नाही.

हे दारिद्र्य मला रुपयांच्या आकड्यात मांडता येईल. अमेरिकेतल्या नागरिकांचं, व्यक्तिगत माणशी मासिक उत्पन्न रु. २,५०० येतं. ब्रिटन आणि जपान ह्या देशांत ते रु. १,००० येतं तर भारतात फक्त ३२ रु. येतं.

### आम्ही भारतीय दरिद्री का?

काही देशांत माणसं श्रीमंत आहेत आणि काही देशात अगदी गरीब आहेत, आपण भारतीय जगातल्या अगदी गरीब देशांपैकी आहोत, असं का?

आयुष्याचा जसाजसा मला अनुभव यायला लागला, तसतसा मी अस्वस्थ होत गेलो. माझ्या गरीबीचं खापर ब्रिटिशांच्या आमच्यावरील वर्चस्वाच्या डोक्यावर फोडून हात झटकून मोकळं व्हायला माझं मन तयार होईना.

सगळी साधनं जवळ असली तरी माणसाचे उद्देश आणि त्या उद्देशाकडे त्याला घेऊन जाणारी त्याची प्रेरणा ही माणसाच्या आयुष्यात सर्वात महत्त्वाची आहेत, हे मला पटलं.

माणसाला काय पाहिजे ते ठरवता आले पाहिजे. जे पाहिजे ते कसं मिळवायचं ते पण ठरवता आलं पाहिजे. उपयोगी काय, निरुपयोगी काय ते ठरवता आलं पाहिजे. जुनं केव्हा घ्यावं हे ठरवता आलं पाहिजे. म्हणजे माणसाला योग्य उद्दिष्ट निवडता आलं पाहिजे आणि त्या उद्दिष्टाकडे जायचा योग्य रस्ताही शोधता आला पाहिजे.

आमचं त्या बाबतीत बरंच चुकलं असं मला वाटतं. आम्ही वाफेच्या इंजिनाकडे पाठ फिरविली. आम्ही देवळांच्या आणि मठांच्या दिशेने पाहू लागलो. जे मिळत होतं त्यावर जगायची आम्ही सवय लावून घेतली. त्यात समाधान मानू लागलो. नवं मिळवायची निकड आम्हाला लागली नाही. उलट, जुनं ते सोनं कसं ठरवायचं याचं एक तर्कदुष्ट तत्त्वज्ञान आम्ही बनवलं.

माणसाचे कष्ट कमी व्हावेत म्हणून यंत्रांचा वापर जे करायला लागले त्यांना आम्ही कमी प्रतीचे समजू लागलो. त्यांच्या यंत्रांनी कापूस पिंजला, सूत कातलं, कापड विणलं तेव्हा आम्ही म्हणालो—"अरे, मेंदू वापरू नका; तुमचे हात

रिकामे राहतील." खरं म्हणजे, आमचे हातही रिकामेच होते. कारण, थोडक्यात असेल त्यांत जगायचं आम्ही ठरवलं होतं. जास्त नकोच होते.

कित्येक शतकापासून तो आजपर्यंत आम्ही हेच करीत आलो. ह्याचं कारण आम्ही नजरेसमोर ठेवलेली उद्दिष्टं आहे. जीवन संपन्न करण्याचा निश्चय आम्ही कधीं केला नाही. व्यक्ती म्हणून नाही, गट म्हणून नाही, समाज म्हणून पण नाही. मग आमची शेती मागासली, उद्योगधंदे निघालेच नाहीत आणि म्हणून ते काढावेत कसे, चालवावेत कसे, ह्याच ज्ञान आणि अनुभव आम्हांला मिळाले नाहीत.

### डबक्यातील राहाणीचे परिणाम

मला असं म्हणायचं आहे की स्थिर आणि संथ जीवन जगायची एकदा सवय लावून घेतली की, त्या सवयीचं समर्थन करणारं तत्त्वज्ञानही आम्ही विणायला लागतो. जुनी पिढी, नव्या पिढीकडे ह्या साचलेल्या पाण्याचा वारसा देते. दोन-चार पिढ्या अशा जातात आणि ह्या साचलेल्या पाण्याचं डबकं तयार होतं. त्यात राहायची सवय होते. विचारांना वळणही तसंच लागतं. असेल तेच टिकवून धरणं सद्गुण वाटतो. ही वृत्ती बनते.

आपल्या भोवतालचे वातावरण, आपल्या समाजाने स्वीकारलेले धार्मिक, राजकीय किंवा सामाजिक विचार ह्या सर्वांचा परिणाम आपल्या विचारावर होत असतो. त्या परिणामांचा प्रभाव पडून आपण एखाद्या विशिष्ट दृष्टिकोनातून स्वतःकडे आणि इतरांच्याकडे पाहायला लागतो.

### प्रगतीच्या मार्गाचे; माणसांचे निर्णय

औद्योगिक क्रांतीने मनुष्याला निसर्गाच्या, परिस्थितीच्या आणि माणसाच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचे दरवाजे उघडे करून दिले. त्या दरवाजांतून जाऊन स्वतंत्र व्हावे किंवा नाही हा निर्णय ज्याचा त्याने घ्यायचा होता. ज्यांनी त्या दरवाज्यांनी जायचे ठरवले, त्यांना असे दिसले की निसर्गाने निर्माण केलेली बरीच संपत्ती यंत्रामुळे त्यांना वापरता येऊ लागली. कोळसा, लोखंड, तेल, पाणी, हजारो खनिज पदार्थ हजारो पद्धतीने वापरले जाऊ लागले आणि त्यातूनच नव्या वस्तू निर्माण होऊ लागल्या. रेल्वे आली, बोटी आल्या, मोटारी आल्या, वीज आली, पेट्रोल आले; आणि ह्या प्रत्येक प्रकारच्या वस्तूच्या निर्मितीसाठी माणसे लागू लागली. निरनिराळ्या कौशल्याची कामे शिकून माणसे निरनिराळी कौशल्यपूर्ण कामे करू लागली. इंग्लंडमध्ये जेव्हा नव्या कारखान्यांची धुराडी आकाशाकडे झेप घेत होती. त्यावेळी आम्ही देवळे बांधीत होतो किंवा आत्मशांतीचे नवे नवे मार्ग शोधीत होतो.

औद्योगिक वाढ करावयाचा निर्णय हा माणसाने घेतला. माणसानं यंत्र शोधली. त्याचे अनेक उपयोग शोधले. माणसानं यंत्र बनविण्याचं, ते वापरण्याचं कौशल्य मिळवलं. ते मिळवितांना तो इतरांचं साह्य घेत होता. ती त्याची व्यक्तीगत गरज होती, तशीच व्यावसायिक गरज पण होती.

प्रगतीचा मार्ग माणसाच्या स्वतःच्या निर्णयावर अवलंबून असतो. कार्यक्षम होणं, अधिक लोकांना धरून ठेवणं, हा चढाओढ जिंकण्याचा मार्ग असतो. कमी खर्चात चांगल्या दर्जाची यंत्रं देणं आणि यंत्रं वापरणार गिऱ्हाईक आमची यंत्रं विकत घेईल अशी व्यवस्था करणं हा कारखान्याच्या यशाचा मार्ग असतो. या पद्धतीनं जिथं औद्योगिक प्रगती झाली तिथे माणसांनी अशी निरनिराळी कौशल्यं वाढवली, एकमेकांची कामं करून दिली आणि नवी यंत्रं शोधली आणि त्यांचे उपयोग शोधून प्रगतीचा वेग वाढवला.

### प्रगती काम करूनच करावयाची आहे

आर्थिक प्रगतीचा हा मार्ग अटळ आहे. ती प्रगती सहजासहजी होत नाही. समाजवादाची शपथ घेतली अन् सगळे कारखाने सरकारी मालकीचे केले की त्या कारखान्यातून मालाचा ओघ आपोआप वाहू लागत नाही. कारखान्यतल्या कामगारांना तो माल तयार करावा लागतो. समाजवादी संघटनेतर्फे दुकान उघडलं तर त्यालाही मालाचा पुरवठा करावाच लागतो. जर आज आम्ही गरीब असलो तर त्या गरीबीचा बराचसा दोष आमच्यावर आहे. आम्ही विज्ञानाकडे, प्रगतीकडे पाठ फिरवली. आताही आम्हाला जी प्रगती करावयाची आहे ती काम करूनच करावी लागणार आहे.

निव्वळ राजकीय घोषणांनी आर्थिक प्रगती होत नाही. माल तयार झाल्याशिवाय त्याचं वाटप—मग ते समाजवादी पद्धतीचं का असेना—होऊ शकत नाही.

### योग्य शिक्षणपद्धतीचा अभाव

बैलगाडीच्या युगातून आपल्याला एकदम जेट युगात उडी घ्यायची आहे. आजच्या यांत्रिक प्रगतीच स्वरूप असं आहे की जेट युगात उडी मारण्याखेरीज गत्यंतर नाही. पण कारखान्यांची यंत्रे नवी असली की आपोआप उत्पादन होत असं नाही. उत्पादन करणारा माणूस असतो. यंत्र आधुनिक असतील, पण ती वापरणारा माणूस तसाच आधुनिक लागतो. भरपूर उत्पादन करायची यंत्राची ताकद असेल, पण उत्पादन करून घ्यायचे, तो माल विकायचा आणि कारखान्यातून नफा मिळवून तो वाढवायचा ही कामे करायला कार्यक्षम माणसे लागतात व त्यांच्या कार्यक्षम संघटना लागतात. उत्पादन खर्च कमी करण्याचा प्रयत्न उत्पादन करणाऱ्या संघटनेला करावा लागतो.

मला वाटते, स्वातंत्र्यानंतरच्या काळात जी कामे आम्हाला करायची होती त्या कामाला लागणारे बरेच गुण आमच्या सर्व पुढाऱ्यांत नव्हते. स्वातंत्र्यानंतर आमच्या नागरिकांच्या आवश्यकता पुऱ्या करायला आम्हाला पुरेसा पैसा पाहिजे होता. पुरेसा पैसा उभा करायला आम्हाला एकच उपाय होता — आम्ही उत्पादक कामं करायला पाहिजे होती आणि उत्पादक कामे कार्य-

क्षमतेने होऊ शकतील अशा संघटना समाजात उभ्या करायला पाहिजे होत्या. ह्या सर्वांचा पाया घालणारी, आणि कार्यक्षम माणसे तयार करणारी शिक्षण पद्धती पाहिजे होती.

असे झाले असते तर आमचा नागरिक इतका गरीब राहिला नसता. त्याने आपली राहाणी बरीच सुधारली असती. पण असे झाले नाही. कारण, ज्यांनी आम्हाला स्वातंत्र्य मिळवून दिल आणि पुढे जे आमचे नेते आणि शासक झाले त्या पुढाऱ्यांनी हे उद्दिष्ट आमच्यासमोर ठेवले नाही.

### समाजवादी वैचारिक नेतृत्व

ज्या सुशिक्षित, समाजवादी विचारांचा स्वीकार करणाऱ्या पुढाऱ्यांच्या हाती आमचे वैचारिक नेतृत्व गेले, त्यांनी आमच्यापुढे रशियाचा आदर्श ठेवला. एक बलवान् केंद्रीय शासनसंस्था असावी, आर्थिक विकासाची कामेही अशी केंद्रित करावी आणि सर्व उद्योगधंदे राज्याच्या मालकीचे करावेत असे त्यांना वाटे. पण सर्वसाधारणतः आमचे जीवन आणि आमचे विचार हे परंपरेच्या चक्रात अडकून फिरत होते. मुख्यतः ऐहिक पायावर उभारलेला समाजवाद इथे विचारात किंवा आचारात मूळ धरू शकला नाही.

दुसरे म्हणजे औद्योगिक उत्पादनाचा भारतात पायाच घातला गेला. नव्हता आणि त्यामुळे समाजवादाची जी इमारत आमच्या ह्या पुढाऱ्यांना उभी करावयाची होती ती तशी राहू शकली नाही. अगदी थोडक्यात सांगायचे तर इथे उत्पादनाची साधने परंपरेच्या मुकटयात गुंडाळलेली असल्यामुळे, वाटपात समानता आणण्याचे प्रयत्न फसले; कारण गरिबीखेरीज इथे वाटून द्यायला फारसे काही नव्हतेच.

औद्योगिक उत्पादन असो की शेतीचे असो, उत्पादन व वाटप शास्त्र स्वीकारायच्या ऐवजी आमच्या पुढाऱ्यांनी आपले राजकीय विचार त्यात बळजबरीने आणले. जे कार्य करायला माणसाला आपले सर्वस्व पणाला लावायचे स्वातंत्र्य द्यावे लागते, त्या औद्योगिक उत्पादनाच्या नाड्या २० वर्षांपूर्वीच्या समाजवादी विचारांनी जखडून टाकल्या. परिणामी, आर्थिक प्रगति तर मंदावलीच; पण भविष्याच्या वाटाही ह्या जुनाट कल्पनांनी अडवून टाकल्या.

### ग्रामीण भागातील नेतृत्व

भरपूर शिकलेल्या पुढाऱ्यांच्या बाबतीत जशी मी तक्रार करतो तशीच बहुजन समाजातून आलेल्या पुढाऱ्यांच्या बद्दलही करता येईल. काही उदाहरणे दोन्ही वर्गाला लागू पडतात. मी खादी वापरण्याबद्दलचे एक उदाहरण घेतो. त्या परंपरेचे नव्या युगाशी पटत नाही आणि बिचारी खादी एखाद्या परक्याच्या घरात केविलवाणा चेहेरा करून चोरासारखी बसलेली दिसते. ज्यांना तिचा असा चेहेरा पाहायचा असेल त्यांनी मंत्री आणि पुढारी वापरीत असलेल्या अमेरिकन बनावटीच्या मोटारींच्या किंवा विमानांच्या पोटात शिरून त्या खादीच्या अवस्थेकडे पाहावे.

एका पद्धतीच्या कापडाचा, ते जीवनाच्या पावित्र्याशी बादरायणी संबंध जोडतात आणि प्रत्येक ठिकाणी खादीच्या कापडाचे अस्तित्व असलेच पाहिजे असा आग्रह धरतात. पारंपरिक विचारात जखडलेल्या मनाचे हे एक उदाहरण आहे. हा प्रश्न खादीपुरता नाही. अशा प्रकारच्या अनेक सवयी आहेत. पोषाखच काय, पण खाण्या-पिण्याच्या बाबतीतही आपल्या सवयी, अनावश्यक आहेत असे दिसले तरी त्या ज्यांना लागल्या आहेत, ते त्या सोडायला तयार होत नाहीत.

अशा राजकीय आणि सामाजिक वातावरणात कुठल्याही प्रकारचे बदल करावयाचे म्हटले तर बहुसंख्य नागरिक ते स्वीकारू शकत नाहीत. अंगी एकदा अनुकरण प्रवृत्ती भिनली की तिचे कवच फोडून नागरिकाचे व्यक्तिमत्व बाहेर पडू शकत नाही, आणि त्याचा विकास होत नाही. व्यक्तीचा विकास बंद झाला की समाजाची प्रगतीही बंद होऊं लागते.

### ऐतिहासिक काळाला गैरवाजवी महत्त्व

आमच्या राजकीय जीवनात ऐतिहासिक काळाला जेवढे महत्त्व देण्यात येते तेवढे भविष्य उज्ज्वल आणि संपन्न करण्याच्या कल्पनांना देण्यात येत नाही. महाराष्ट्राचे तर हे वैशिष्ट्य आहे. आमच्या राजकीय पुढाऱ्यापासून तो साहित्यिकापर्यंत बहुतेकांना ज्ञानेश्वरापासून तो लोकमान्य टिळकांपर्यंत मृत व्यक्तींची नावे घेऊन व त्यांच्या कर्तृत्वाचे दाखले देऊन बोलायची सवय आहे. आमचे राजकारणी १९६८ साली छत्रपती शिवाजी महाराजांशी जी लगट करतात ती पाहून मला पुष्कळदा वाटते की, ह्यांना छत्रपतींच्या नंतर ३०० वर्षे काळ पुढे गेल्याचे बहुधा वाईट वाटत असावे. त्यामुळे त्यांच्या कल्पनेला व व्यक्तिगत विचारांना जे काही हवेसे वाटत असेल त्यासाठी ते शिवाजी महाराजांच्या काळात जाऊन पोचतात. असे पुढारी आपली शरीरे ह्या जेट युगात ठेवून मने मात्र त्या कल्पनेच्या ऐतिहासिक काळात खेचून नेतात. देशाची प्रगती करण्यासाठी पुढे आलेले असले पुढारी घोड्यावर स्वार होऊन बसताना आपले तोंड घोड्याच्या शेपटीकडे करून बसतात असे मला वाटते.

आमच्या पुढाऱ्यांचे विचार जुन्या परंपरेला अडकून पडलेले आहेत ते स्पष्ट दिसते. प्रश्न असा पडतो की हे लक्षात येण्यासारखे असूनही पुढारी ह्या वृत्ती सोडीत का नाहीत? ह्याचे कारण असे आहे की त्यांची सामाजिक प्रतिष्ठा ह्यावर अवलंबून आहे.

### सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पना

मी सामाजिक प्रतिष्ठेच्या विरुद्ध नाही. उलट सामाजिक प्रतिष्ठा मिळाली तर मनुष्य अधिक उत्साहाने काम करतो असा माझा अनुभव आहे. पण माझ्या सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पना आमच्या पुढाऱ्यांच्या कल्पनेपेक्षा थोड्या निराळ्या आहेत.

जनतेने किंवा सरकारने दिलेल्या पदव्यांप्रमाणेच व्यावसायिक क्षेत्रातर्फे अधिकार-निदर्शक शब्दही आमच्या समाजात प्रतिष्ठा-निदर्शक शब्द बनले आहेत. राजकीय पुढारी व मंत्री हे राजकीय क्षेत्रात तर जनरल मॅनेजर किंवा मॅनेजर हे शब्दही व्यवसाय क्षेत्रात सामाजिक प्रतिष्ठेचे समजले जातात. आज एखाद्या लहान प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या डायरेक्टरपासुन तो निव्वळ सरकारी मदतीवर चालणाऱ्या सहकार संघटनेच्या मॅनेजिंग डायरेक्टरापर्यंत प्रत्येकाला आपल्याला स्थान-निदर्शक नावाचे सामाजिक महत्त्व वाटत असते.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सहकारी सोसायटीच्या अध्यक्षाला जेवढे महत्त्व असते तेवढे एखाद्या व्यापारी कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टराला नसते. माझे तर असे मत आहे की उत्पादक कामाची प्रतिष्ठा आम्ही ह्या भागात अजूनही मानीत नाही. पदवीचा किंवा स्थानाचा उपयोग प्रतिष्ठेकरिताच केला जातो. व्यावसायिक कौशल्याशी ह्या प्रतिष्ठेचा संबंध राहिलेला नाही. उलट व्यावसायिक कौशल्य असेल तर ते नाकारून आम्ही अनेक संघटना समाजविरोधी असल्याचे ठरवितो. पारंपरिक विचार, चुकीची राजकीय भूमिका, व्यावसायिक कौशल्याचे महत्त्व नाकारण्याची प्रवृत्ती, ह्या सर्वांमुळे आमची सामाजिक प्रकृती बिघडली आहे. ती विकृत झाली आहे.

वास्तविक आमच्या लोकशाहीच्या विशाल वृक्षाचे मूळ व्यक्तीच्या विविधरूपी होणाऱ्या प्रगतीत आहे. व्यक्ती म्हणजे नागरिक हे मी आमच्या समाजवृक्षाचे मूळ मानतो. तसेच निरनिराळे गट व संघटना ह्या त्या वृक्षाच्या फांद्या आणि पारंब्या मानतो.

समाजवृक्षाच्या सर्व मुळांना, फांद्यांना आणि पारंब्यांना वाढू द्या. त्यांना छाटायला सुरुवात केली तर वृक्षच अशक्त होईल व मरेल. पण हे आम्ही ओळखले नाही. समाजरचनेत आम्ही अनेक विकृत वृत्ती आणल्या.

ह्या विकृतींचा परिणाम आमच्या आर्थिक प्रगतीवर झालेला आहे, तसाच तो व्यावसायिक वृत्तीवरही झालेला आहे. व्यवसायातील सचोटी आणि कौशल्य मिळविण्यात अभिमान मानण्यापेक्षा पारंपरिक प्रतिष्ठेच्या मागे लागून आम्ही वागत असतो.

### विकसनशील देशांतील पुढाऱ्यांचे महत्त्व

विज्ञानाने साधने कितीही दिली तरी जीवन संपन्न करण्याकरिता त्यांचा वापर करायला काही विशिष्ट वृत्ती निर्माण व्हाव्या लागतात. जे आहे, जसे आहे ते आणि तसे स्वीकारले पहिजे हे मला मान्य नाही. मी पुढाऱ्यांच्यावर टीका करतो ह्याचे एक मुख्य कारण असं आहे की विकासाच्या मार्गावर असलेल्या आपल्यासारख्या देशात पुढाऱ्यांना फार महत्त्व असते. आमच्या राजकीय, सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनावर ते खोल परिणाम करू शकतात. आपण आपल्या राष्ट्रीय गरीबीचे मूळ शोधू लागलो की मी म्हणतो ह्याचे महत्त्व आपल्याला पटू लागते. अगदी थोडक्यात मी माझे म्हणणे सांगतो.

आमचा आर्थिक विकास व्हावा म्हणून आम्ही प्रचंड विकास योजना आखल्या. त्या अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाल्या नाहीत. पण ह्याचे कारण साधनांचा तुटवडा होता असे नाही. १५–१६ वर्षांत आम्ही ३० हजार ते ४० हजार कोटी रुपये भांडवल म्हणून गुंतवले. म्हणजे पैशाचा तुटवडा आम्हांला पडला नाही.

आमच्यात अनुभवी शासक होते. कार्यक्षम शासन यंत्र होते. म्हणजे आमच्यात लायक किंवा शिकलेल्या माणसांचा तुटवडा नव्हता.

आमच्या देशात राजकीय स्थैर्य भरपूर होते आणि ज्या काँग्रेस पक्षाच्या हातात अजूनही भारताची शासन व्यवस्था आहे त्या पक्षाला जनतेने भरघोस पाठिंबा दिलेला आहे.

सर्व जगाने आम्हाला मित्रत्वाने मदत केली आहे. रशियाने केली आणि ज्यांना आम्ही भांडवलशाही राष्ट्रे म्हणतो त्यांनीही केली. त्यांनी नुसता पैसाच दिला नाही तर यांत्रिक आणि तांत्रिक ज्ञानही दिले.

तरीही आम्हांला प्रगती करता आली नाही. ह्याबाबत मी आतापर्यंत पुढाऱ्यांवर टीका केली पण आपण सर्वांनी विचार केला तर पुढाऱ्यांच्याइतकेच नागरिकही दोषी असतात हे आपल्याला दिसेल. पुढारी हा आमच्यातलाच एक असतो व तो जर अयोग्य असला तर त्याला पुढारी म्हणून मानण्यात आम्ही चूक करतो हे उघड आहे.

महाराष्ट्राचे उदाहरण नजरेसमोर आणले तरी मी म्हणतो ते स्पष्ट होईल.

### सहकारी सोसायट्या व कारखाने

महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातले पुढारी आणि सहकारी सोसायट्या ह्या आमच्या नजरेसमोर तात्डतोब उभ्या राहतात.

पुढाऱ्याचे चित्र पाहिले तर असे दिसते की, त्याच्या घरची शेती करण्यात त्याचे लक्ष नसते. बहुधा एखाद्या तरी सहकारी सोसायटीचा तो पदाधिकारी असतो. सभा भरवणे, व्याख्याने देणे, त्याच्यापेक्षा मोठ्या स्थानावर असलेल्या राजकीय पुढाऱ्यांत आणि सरकारी अधिकाऱ्यांत मिसळणे त्याला फार आवडतं. व्यावसायिक गटात तो फारसा मिसळत नाही. कारखानदार किंवा अर्थशास्त्रज्ञ ह्यांच्यापासून दूर राहातो. संपत्ती त्याला आवडते व मिळेल त्या मार्गाने तो पैसा मिळवतो. पण संपत्तीचा उपयोग उत्पादक कामासाठी खर्च करायला तो फारसा तयार नसतो., त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात उद्योगधंदे निघाले पाहिजेत असा प्रचार तो करतो. पण द्राक्षाच्या मळ्यातून मिळवलेले स्वतःचे लाख रुपये अडकवून एखादा कारखाना तो चालविणार नाही.

ह्याचे कारण संपत्तीची निर्मिती, तिचा वापर आणि संपत्ती-बद्दलच्या त्याच्या भावना ह्या औद्योगिक समाजातल्या व्यक्तीच्यापेक्षा निराळ्या आहेत. तो संपत्तीला चिकटून राहातो व सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी तिचा उपयोग करतो.

ह्याचा अर्थ तो अजिबात खर्च करीत नाही, असे नाही. त्याच्या घरचे लग्न-कार्य असो की त्याच्या कुलदेवतेचा उत्सव असो. पारंपरिक समारंभावर तो भरपूर खर्च करताना दिसतो. तसेच निवडणुकांवरही तो भरपूर खर्च करतो. कारण, निवडणुकांचा अर्थ त्याच्या दृष्टीने सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्याची आणि सार्वजनिक संपत्तीचा खर्च करण्याची संधी मिळणे होय. ही संधी मिळावी म्हणून तो पुढे येतो, मेहनत व खर्च करतो आणि निवडून यायची धडपड करतो.

आता सहकारी कारखाने पाहू. सहकारी साखर कारखान्यांच्या संचालक मंडळावर निवडून येण्यासाठी हजारो रुपये खर्च केले जातात. असे म्हणतात की संचालक मंडळाच्या सभासदाला अमर्याद सत्ता वापरून झालेला सर्व खर्च तर भरून काढता येतोच पण पण शिवाय अनेक अनिष्ट मार्गांनी पैसा कमावता येतो. शिवाय शेतकऱ्यांचा एक मोठा वर्ग आपल्या मागे अनुयायी म्हणून खेचता येतो आणि राजकीय क्षेत्रातही महत्त्वाचे स्थान मिळविता येते.

## नागरिका, जागा हो

ह्या परिस्थितीत समाजाला कोंडून ठेवणारे तत्त्वज्ञान पुढाऱ्यांनी मांडले किंवा नागरिकाला हालता येणार नाही अशा चौकटी त्याच्या भोवती उभ्या केल्या तर त्याविरुद्ध बंड करणे हे नागरिकाचे कर्तव्य असते व ते त्याच्या हिताचे असते.

पण ह्यासाठी नागरिक स्वतः जागा व्हावा लागतो. आमचा नागरिक अजून पुरेसा जागा झालेला नाही. त्याने आपले महत्त्व ओळखले नाही किंवा व्यक्ती व संघटनास्वातंत्र्याचा निर्भयपणे वापर केला नाही. माझ्या मते त्याने सर्वात मोठी चूक जर कोणती केली असेल तर आपल्या जीवनाची दिशा ठरविण्याचा अधिकार स्वतः न वापरता तो अशा पुढाऱ्यांच्याकडे सुपूर्द केला. हा आमचा नागरिक जेट युगात वर यायची धडपड करतो आहे.

## माणूस हा घटक सर्वात महत्त्वाचा

जेट युगातली यंत्र पाहून पुष्कळदा मन गोंधळून जातं. आजची यंत्रे गुंतागुंतीची आहेत, अजस्र आहेत आणि नाजूक आहेत. माणसाच्या हातातलं कौशल्य त्यांनी आत्मसात केलं, तसंच माणसाच्या मेंदूचं कामही ते काही प्रमाणात करतात.

यंत्रांचं हे कर्तृत्व पाहिलं की मनुष्याचं मन थक्क होतं खरं, पण हे कर्तृत्व दाखविणारी यंत्रं निर्माण करण्याचं सामर्थ्य फक्त माणसाच्या मेंदूत आणि त्याच्या चिकाटीने परिश्रम करण्याच्या पात्रतेत आहे, हे पुष्कळदा आपण विसरतो.

जन्मभर कारखाने चालवून मला जर सर्वात महत्त्वाचं तत्त्व काही पटलं असेल तर ते म्हणजे कुठल्याही कार्यात माणसाइतका महत्त्वाचा दुसरा घटक नसतो.

हे तत्त्व सार्थ आहे. पण हे तत्त्व मानलं की दुसरं एक सत्य मानावं लागतं. ते सत्य असं की स्वातंत्र्यानंतर आम्हाला आर्थिक विकासाच्या कामात आलेले यश किंवा अपयश हे आमच्या माणसांचं यश किंवा अपयश आहे; त्या माणसात पुढारी आले आणि नागरिकही आले.

म्हणून निव्वळ पुढाऱ्यांना दोष देऊन आमच्या अपयशाचा दोष त्यांच्या माथ्यावर मारायला मी तयार नाही. मी स्वतः तर अपयश हे व्यवहारी जीवनाचा भाग म्हणून पत्करायला तयार असतो. यश-अपयश ही दोन्हीही सारख्याच शांत वृत्तीने स्वीकारायला आयुष्यांतल्या उन्हाळ्यांची आणि पावसाळ्यांची संवय करून घ्यावी लागते.

## पळवाटा आणि सबबींच्या भिंती

माझ्या अनुभवाने मला असं पटवून दिलं आहे की माणूस स्वतःच स्वतःचा मित्र किंवा शत्रू असतो. जे निराशेच्या आहारी जातात, जे अडचणींना घाबरतात किंवा त्यांना टाळू पाहातात, ते कुठल्या तरी पळवाटा शोधायला लागतात, कुठल्या तरी सबबी समोर उभ्या करतात, त्या सबबींच्या भिंतीमागे लपून आयुष्यांतल्या आवहानांचे तीर चुकवायला पाहातात. आयुष्य जगण्याचा मार्ग अशा पळवाटांतून जात नसतो. नव्या जगाची आव्हानं सबबींच्या भिंती आड लपून चुकवता येत नाहीत. माझा अनुभव असा आहे की, "मी जबाबदारी घेतो" असं ठामपणे म्हणणारी माणसं फारच थोडी असतात. उलट हजारो-लाखोंच्या समुदायांत लपून आपलं व्यक्तिमत्त्व बुडवून टाकणारे हजारो असतात. अशा माणसांना यशस्वी होण्यासाठी जसा एखादा नेता आवश्यक वाटतो तसंच अपयशाच्या प्रसंगी जिच्या पाठीमागे जाऊन लपता येईल अशी भिंतही आवश्यक वाटते.

माणसाच्या कर्तबगारीतून जेट युग तयार झालं त्यात रहस्य नाही, जादू नाही, ईश्वरी देणगी नाही—ह्यात फक्त मानवी बुद्धी आणि मानवी श्रम आहेत. माणूस यंत्र निर्माण करतो, तेव्हा ते दुसऱ्याला वापरायला देवून त्याच्या जीवनातले श्रम वाचवतो. ज्यास्तीत ज्यास लोक त्याला मोबदला देतात आणि अशा मार्गाने संपत्ती मिळते. म्हणून, सामाजिक रचनेत जेव्हा व्यक्तीच्या कर्तृत्वाला महत्त्व द्यावयाच्या ऐवजी आपण ते सांप्रदायिकतेला, अनुयायित्वाच्या किंवा संख्येच्या बळाला देवू लागतो, तेव्हा त्या समाजातला माणूस स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करू शकत नाही; समाज त्याला तसं करू देत नाही.

## प्रत्येक कामगार संपत्तीचा निर्माता

ज्या देशात शंभरातले फक्त सात-आठ लोक कारखान्यात कामं करतात, त्या देशात प्रत्येक कामगार हा संपत्तीचा निर्माता

आहे, हे तत्त्व पटवून देण्याची फारच आवश्यकता आहे. सर्वस्व पणाला लावून उत्पादक कामात रमून गेलेली, बाकीचे जग विसरलेली, एकमेकांच्या कामाला पूरक काम करणारी माणसं पाहिली, म्हणजे समजतं, की इथं संपत्ती निर्माण होते. इथं प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व वाढत जातं, कौशल्य वाढत जातं, उत्पन्नही वाढत जातं, प्रत्येकाच्या कुटुंबासाठी पैसा मिळत जातो.

जेट युग हे व्यक्तिगत पात्रतेचे आणि त्या पात्रतेवर आधारलेल्या सामाजिक जीवनाचं युग आहे. ही पात्रता फक्त आपल्या हृदयतल्या निश्चयाच्या लहान शेतात पिकते. ज्या ज्या क्षेत्रात आम्ही नागरिक म्हणून काम करतो, त्या त्या क्षेत्रात आमचं कौशल्य शिगेला पोचवणं हा आमच्या यशाचा मार्ग आहे, व ते यश मिळविण्याचा निश्चय हीच आमची प्रेरणा आहे. कर्तृत्ववान माणसासारखं मोलाचं भांडवल जगात दुसरं कोणतही नाही. कर्तृत्ववान माणसं ही ह्या देशातच व्हायला हवीत. समाजातल्या प्रत्येकालाच त्याचा पाया घालावा लागेल. पायाचा दगड नेहमी घरात, कुटुंबात बसवला जातो. व्यवसाय, उद्योग, संघटना, ही चढाओढीची क्षेत्रं आहेत. त्यांत यश मिळवायचं असेल, तर धोका पत्करलाच पाहिजे, श्रम केलेच पाहिजेत, यश मिळालं तरी डोकं शांत ठेवलं पाहिजे, अपयश मिळालं तरी निराशेला बळी पडायचं नाकारलं पाहिजे. पुनः प्रयत्न करायला पाहिजे. यशापर्यंत पोचायला हा एकच राजमार्ग आहे; इथ पळवाटांचा उपयोग नाही. प्रत्येक व्यक्तीने आणि समाजाने प्रत्येक दिवशी मन लावून आणि कष्ट करूनच हे गुण मिळवावे लागले आहेत. लहान-मोठे असंख्य शोध, लहान-मोठे असंख्य निर्णय आणि लहान-मोठ्या असंख्य संघटना ह्यावरच प्रगती अवलंबून असते.

### संपत्तीचा पाया व्यक्तीच्या गुणांत

असे कामगार, व्यवस्थापक, विक्रेते इंजिनिअर, त्यांना शिकवणारे शिक्षक आणि साऱ्या समाजाचे नियंत्रण करणारे शासक ह्यातल्या प्रत्येकाच्या कौशल्याचा आधार मिळाल्याशिवाय संपत्ती निर्माण होत नाही. संपत्तीचा पाया संख्येत नाही; व्यक्तिच्या गुणात आहे. यशस्वी होण्याच्या तिच्या निर्धारात आहे. आपल्या बुद्धीला आणि सामर्थ्याला काय झेपेल, त्यांचा उपयोग करून जास्तीत जास्त फायदा कसा होईल ह्या बाबतच्या निर्णयाला आहे. भोवतालच्या माणसांची मनं जिंकून त्यांचं सहकार्य मिळविण्यात आहे. त्या सहकार्यातून स्वतःची आणि इतरांची प्रगती करून घेण्यात आहे.

महाराष्ट्रात ह्या जाणीवेचा पूर्ण अभाव आहे असं माझं मत नाही. माझा अनुभव उलट आहे. आज नवी नवी क्षेत्रं धुंडाळत हुषार, धाडसी माणसं जगभर जात आहेत. आमचा माल परदेशी बाजार पेठांत विकीत आहेत. देशातल्या सर्व अडचणी सहन करूनही माणसं कारखाने चालवीत आहेत. दुकानं चालवीत आहेत.

आज शासकही मनाने बदलत आहेत. राजकीय कार्यकर्ते, समाजसेवक, शिक्षक, लेखक, ह्या सर्वांत अपुरेपणाची जाणीव आहे, आणि तो अपुरेपणा दूर करायची त्यांची धडपड आहे. मी राजकीय पुढाऱ्यांच्या पारंपारिक विचारावर जशी कडक टीका केली तसेच त्यातले काही लोक प्रगती झपाट्याने व्हावी म्हणून आपले मार्ग बदलायला तयार आहेत. महाराष्ट्रात मला असे अनुभव आले आहेत. ग्रामीण महाराष्ट्रातही हे कार्य व्हायला लागलं आहे.

### वेरूळचे प्रातिनिधिक उदाहरण

औरंगाबाद जिल्ह्यातल्या वेरुळ गावचा अनुभव मी विसरणार नाही. ह्या गावातलं दारिद्र्य आणि आजार दूर व्हावा म्हणून मुंबईच्या समाजसेविका ताई बस्तीकर आपलं मुंबईतलं घर आणि चांगली सरकारी नोकरी सोडून वेरुळला जाऊन राहिल्या. त्यांनी आपल्या कामाचं उद्दीष्टही मोठं आकर्षक ठेवलं आहे. वेरुळच्या लेणी जगप्रसिद्ध आहेत. ती पाहायला दर वर्षी लाखो लोक जातात. इतकी सुंदर लेणी असलेलं गाव मात्र दरिद्री आहे. ताई म्हणाल्या, "देवानं एक काळाकभिन्न, कुरुप खडक दिला. माणसाच्या हातांनी साध्या हातोडा-छन्नीच्या हत्याराचा उपयोग करून त्या दगडावर प्रहार केले व एकेक तुकडा फोडून त्यांत सौंदर्य निर्माण केलं. मग तसेच माणसाचे हात, तोच निश्चय आणि तीच चिकाटी वापरून हे गाव आम्हाला चांगलं का करता येऊ नये ?"

महाराष्ट्रातल्या एका वृत्तीचं आणि प्रगतीच्या एका नव्या मार्गाचं हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. ह्या साऱ्या कामाचा गाभा दोन कृतीत आहे. "मी हे गाव संपन्न करीन" हा ताईंचा निश्चय आणि "आम्ही गरीब राहाणार नाही" ही गावच्या लहान मुलांची प्रतिज्ञा. ही दोन उद्दिष्टं साधण्यासाठी संघटना, पैसा, सरकारी मदत, ही सारी साधनं आहेत. ती पुरवायला समाजातल्या सर्व थरांतले लोक एकत्र आले आहेत.

### आधी स्वतःच्या आयुष्याचा मालक हो

जेट युगांत यश मिळवू पाहाणाऱ्या मराठी माणसाला मी म्हणूनच म्हणेन, प्रथम तू तुझ्या आयुष्याचा मालक हो. पुढाऱ्यांच्या आदेशावर अवलंबून राहू नकोस. तुझे निर्णय तू स्वतः घे. स्वतःला नियमित काम करायची शिस्त लाव. ती लावताना गबाळपणा काढून टाक. तुझं अक्षर वाईट असेल, तर जुन्या पिढीसारखे कित्ते गिरव व ते सुधार. अशक्त असशील तर भरपूर खेळ, आणि व्यायाम घे. अभ्यासात लक्ष लागत नसेल तर जुन्या पिढीसारखे रोज थोडं पाठांतर कर व मनाला एकलक्षी व्हायचं वळण लाव.

जिथं राहात असशील तिथं स्वच्छता राख. स्वतःचे हात वापर. कचरा काढ, कपडे धू. रोज दाढी कर. हे रोज, नेहमी, नियमित कर. मग तुला कामाची हत्यारं स्वच्छ ठेवायला त्रास होणार नाही.

आयुष्याला भिऊ नकोस. तुझे आईबाप पुण्यास असतील आणि तुझ्या कुटुंबाच्या दहा पिढ्या पुण्यास गेल्या असतील. पण जमशेदपूरला जाऊन तुला चांगलं काम व जास्त पैसे मिळत असतील तर जमशेदपूरला जाऊन ते मिळव. पुण्यात राहून दरिद्री होऊ नकोस.

जे काही करशील ते उत्तमातलं उत्तम करता येईतो थांबू नकोस. अर्ध्या वाटेवर थकून, निराश होऊन बैठक मारणारा आपल्या उद्दीष्टापर्यन्त पोचत तर नाहीच, पण अर्धी वाट चालण्याचे श्रमही फुकट घालवीत असतो, ह्याची आठवण ठेव. म्हणून यशाची शिडी चढशील ती सर्वात वरची पायरी चढून जायच्या निश्चयानेच चढ.

हे सारं स्वतःच्या हाताने कर. ह्यासाठी स्वतःच्या मेंदूला आणि हृदयाला ताण दे. जेव्हा तुझ्या हातून हे व्हायला लागेल, तू, तुझे भाऊ आणि तुझे मित्र उत्तम इंजिनिअर, उत्तम डॉक्टर, उत्तम शिक्षक, उत्तम समाजसेवक बनतील तेव्हा तुला दिसेल की यश मिळविण्यात ज्यांचं आयुष्य जातं त्यांचं हृदयही समाधानाने भरून येतं.

ह्या यशाच्या मार्गाने जाण्यासाठी स्वतःबद्दल अभिमान बाळग. "लाखांतला एक" होऊ नकोस. निदान दहाचा तरी पुढारी हो. दुसरा कोणी लाख रुपये मिळवतो ह्याचं वैषम्य मानू नकोस. स्वतःचे हजार आधी कमवून दाखवं. समाजात किती काळाबाजारवाले आहेत ह्याची खानेसुमारी काढू नकोस. त्यांच्या पेक्षा स्वतः कार्यक्षमतेने व्यापार करून दाखव, गिऱ्हाइकांची सेवा कर, व्यवहार सचोटीचा ठेव आणि यशस्वी होऊन दाखव.

### तुसडेपणा नको; सहकार्य मिळव

तुसडा स्वभाव हे शौर्याचं लक्षण नसतं हे लक्षात ठेव; ती मनाची विकृती आहे. एकलक्षी प्रयत्न करणं म्हणजे एक उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून त्याच्याच मागे लागणं; पण ह्याचा अर्थ इतरांची उद्दिष्टे क्षुद्र समजणं नव्हे. स्वतःबद्दल अभिमान बाळगणं म्हणजे इतरांच्याबद्दल तुच्छता दाखवणं नव्हे. 'आपलं ते चांगलं' असं वाटणं स्वाभाविक खरं-पण आपलं ते चांगलं मानलं म्हणजे 'इतरांचं ते वाईट' असं ठरत नाही.

यशस्वी व्हायला एका माणसाचा निश्चय लागतो पण हजारोंचं सहकार्य लागतं. हे 'हजारो' घरांत, रस्त्यात, गावांत, देशांत आणि जगांत सर्वत्र पसरलेले आहेत. त्यांचं सहकार्य मिळवायचं असलं तर त्यांची मनं जिंकायला पाहिजेत. त्यांच्यात जा, मिसळ आणि त्यांची मनं जिंकून घे.

आपली उद्दिष्ट मिळवायचा मार्ग पक्क्या पायावर बसव. अभ्यास, तर्कशुद्ध विचार, बरोबर काय व चूक काय ते ठरविण्याची पात्रता, जुन्यापासूनही शिकायची तयारी-ही जशी पाहिजेत तसाच सर्वस्वी जुन्यात अडकून न पडण्याचा निर्धारही पाहिजे. अनुभवाचं महत्त्व जरूर आहे. मावळता दिवस जसा नव्या दिवसाला रात्रीच्या दोराने बांधून आणतो, तसंच दुसऱ्याच्या अनुभवाच्या अभ्यासाला सुधारलेले मार्ग जोडून आणावे लागतात. म्हणूनच काय घ्यावं आणि काय टाकावं ते कळावं लागतं. त्यांचा समतोल अभ्यास करून निर्णय घ्यावे लागतात.

हे केलं तर जेट युग तुझं आहे. विज्ञान व वेग ही माणसाच्या कर्तृत्वाची प्रतीके आहेत; त्याच्या नैराश्याच्या खुणा नव्हेत.

ज्यांना असं वाटत असेल की व्यक्तिगत आयुष्य संपन्न आणि सुखी करण्यासाठी कोणी तरी तयार केलेली एखादी योजना आपल्याला मिळावी आणि त्या योजनेप्रमाणे जाऊन आपण यशस्वी व्हावं; त्यांना मी म्हणेन की हा मार्ग परावलंबनाचा आहे. ह्या मार्गाने हाती यश येत नाही. तुम्ही निरखून पाहा-तुम्हाला दिसेल की प्रत्येक यशस्वी जीवनामागे निश्चयाची व श्रमाची प्रेरणा असते.

---

### लोणची, चटण्या व पापड ह्यांची निर्गत

गेल्या वर्षी भारताने ५३ लक्ष रु. किंमतीची लोणची व चटण्या ह्यांची निर्गत केली. ग्रेट ब्रिटनची खरेदी ३२ लक्ष रु.ची झाली. गेल्या वर्षी २० लक्ष रु. चे पापड परदेशी गेले.

---

### ग्रेट ब्रिटनमधील पंजाब्यांची ट्रॅक्टर्सची देणगी

ग्रेट ब्रिटनमध्ये स्थाइक झालेले पंजाबी पंजाबमधील आपल्या नातलगांसाठी १,००० ट्रॅक्टर्स लवकरच पाठविणार आहेत. ह्या ट्रॅक्टर्सवर कस्टम्स ड्यूटी आकारण्यांत येणार नाही.

---

### पूर्व आफ्रिकेतील हिंदी लोक परतू लागले

कीनिआमधील हिंदी लोक भारताला परत येण्यास प्रारंभ झाला आहे. उद्योगधंद्याच्या निमित्ताने तेथे गेलेले हे लोक कॉमनवेल्थ राष्ट्रगटाचे नागरिक आहेत. परंतु नुकत्याच मंजूर करण्यात आलेल्या ब्रिटिश कायद्याप्रमाणे त्यांना ब्रिटनमध्ये स्थायिक होता येत नाही. कीनिआतील ६० हजार हिंदी नागरिक ह्या आपत्तीत सापडले आहेत. त्यांना कीनिआत राहण्याचे परवाने मिळालेले नाहीत. त्या देशाचे नागरिकत्वही त्यांनी स्वीकारलेले नाही. कीनिआच्या आर्थिक विकासास ज्यांनी हातभार लावलेला आहे, असे ५१७ हिंदी नागरिक नुकतेच मुंबईला आले. त्यांचा पहिला ५४ जणांचा एक गट ह्यापूर्वीच भारतात आला आहे.

---




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.